# मूल्ये आणि नैतिकता (Values and Ethics)

## अभ्यासक्रम

**2.13 Values and Ethics: मूल्ये आणि नैतिकता**

- Fostering of social norms, values and ethics through formal and informal agencies such as family, religion, education, media etc.

कुटुंब, धर्म, शिक्षण संस्था, प्रसार माध्यमे इत्यादी औपचारिक आणि अनौपचारिक संघटनांच्या माध्यमातून सामाजिक मापदंड, मूल्ये व नैतिकतेची जोपासना.

### प्रास्ताविक

- नितीशास्त्र म्हणजे नितीमत्तेचे/नैतिकतेचे विज्ञान होय. नितीमत्ता किंवा नैतिकता म्हणजे व्यक्तींची चांगले-वाईट, योग्य-अयोग्य यांमध्ये स्पष्ट करण्याची क्षमता होय. मानवी जीवनात नैतिकता व मूल्यांना खूप महत्व आहे. ही मूल्ये विकसित होण्याची प्रक्रिया जन्मभर चालूच असते. मात्र ती बालपणात व प्रौढावस्थेमध्ये अधिक वेगाने चालू असते. त्यांच्या निर्मितीमध्ये व जोपसनेमध्ये विविध घटक आपली भूमिका बजावत असतात.

### मूल्ये व नैतिकतेची जोपसना करणारे घटक:

- व्यक्तीच्या जिवनात मूल्यांचे बिजारोपण व नैतिक विकासामध्ये कुटुंब, समाज, शिक्षण संस्था, धार्मिक संस्था, प्रसार माध्यमे इत्यादींचे महत्वपूर्ण योगदान असते. मूल्ये विकसित होण्यासाठी कोणताही एक घटक नव्हे तर विविध घटकांची आंतर-क्रिया कारणीभूत असते.

### कुटुंबाची भूमिका:

- मूल्ये व नितीमत्ता विकसित करण्यामध्ये कुटुंबाची सर्वात महत्वाची भूमिका असते, कारण कुटुंब ही व्यक्तीची पहिली शाळा असते, जेथे बालके मूल्यांचे पहिले धडे शिकतो. जन्माच्या वेळी बालकाचे मन कोऱ्या कागदाप्रमाणे असते. बाल्यावस्था निर्मल पाण्यासारखी असते. पाणी ज्याप्रमाणे पात्र व स्थितीनुरूप स्वरूप धारण करते त्याचप्रमाणे चांगल्या कौटुंबिक वातावरणाचा सकारात्मक परिणाम बालकांवर पडतो, तर चुकीच्या वातावरणात बालक कुसंस्कार व दुर्गुण ग्रहण करतो.
- संस्कृतीच्या घटकांची माहिती मुलांना सांगणे, तसेच त्यांच्या व्यक्तिगत विकासाचे दिशा-निर्देशन करणे याची जबाबदारी कुटुंबावर असते. बालपण हा जिवनाच्या इमारतीचा पाया असतो. त्यामुळेच म्हटले जाते की, जी बिजे बालपणी रूजविली जातात तशीच फळे जीवनवृक्षाला येतात. त्यामुळे बालपणी मिळणारे अनौपचारिक कौटुंबिक शिक्षण हे शाळा, कॉलेजेस व विद्यापीठात प्राप्त होणाऱ्या शिक्षणापेक्षाही अधिक महत्वपूर्ण असते. त्यामुळेच डॉ. ए.पी.जे. अब्दूल कलाम यांनी म्हटले आहे की, "*जर एखाद्या देशाला भ्रष्टाचारमुक्त आणि सुंदर मन असलेल्या लोकांचा देश बनवायचे असेल तर माझे दृढ मत आहे की समाजातील तीन प्रमुख सदस्य असे करू शकतात- माता, पिता व गुरू.*"

### १) मातापिता आणि बालक यांमध्ये होणारी आंतरक्रिया:

- बालकांच्या समाजीकरणात मातापिता व बालक यांमध्ये होणाऱ्या कौटुंबिक आंतरक्रियांची खूप महत्वाची भूमिका आहे. जे मातापिता आपल्या मुलांना अधिक प्रेम व स्नेह देतात त्यामध्ये अधिक हार्दिकता असते. याउलट जे मातापिता मुलांना छोट्या छोट्या गोष्टींमुळे रागवतात, मारतात किंवा शिव्या देतात त्यांमध्ये विद्वेषता अधिक असते. हार्दिकता असलेल्या मातापित्यांच्या बालकांमध्ये सामाजिक गुण व व्यवहारांचा विकास लवकर होतो, तर विद्वेषता असलेल्या मातापित्यांच्या बालकांमध्ये तो लवकर होत नाही. आईवडिलांकडून प्रेम व स्नेह मिळणाऱ्या बालकांमध्ये सुरक्षेची भावना, आत्मविश्वास, आत्मसन्मान इत्यादी गुणांचा विकास होतो, ज्यांच्या आधारावर नंतर अनेक समाजमान्य व्यवहारांचा वेगाने विकास होत जातो.
- प्रेम व स्नेह यांबरोबरच बालकांच्या समाजीकरणावर बालकांच्या कृत्यांवर मातापित्यांचे नियंत्रण किती प्रमाणात आहे, याचाही प्रभाव पडतो. जे मातापिता आपल्या मुलांच्या कार्य-व्यवहारांमध्ये अति हस्तक्षेप करीत नाही व त्यांना एका मर्यादेपर्यंत स्वतःच्या कृती करण्याचे पर्याप्त स्वातंत्र्य देतात अशा बालकांमध्ये चांगले सामाजिक व्यवहार शिकण्याची अधिक

प्रेरणा दिसून येते. त्यांच्यामध्ये आत्मनियंत्रण, समर्थता व अनुकूलनशीलता यांसारखी सामाजिक मूल्ये अधिक वेगाने विकसित होतात. याउलट जे मातापिता आपल्या मुलांच्या कृतींवर अधिक प्रतिबंध लावतात त्यांमध्ये ही मूल्ये विकसित होत नाहीत. अशा रितीने, मातापित्यांद्वारे अति प्रतिबंध किंवा अति सूट या दोन्हींमुळे बालकांच्या समाजीकरणाची प्रक्रिया मंदावते.

**२)कुटुंबाचा आकार:**

- कुटुंबाच्या अधिक आकारामुळे बालकांच्या समाजीकरणावर नकारात्मक परिणाम होतो. कुटुंबात बालकांची संख्या जसजशी अधिक होत जाते, तशी मातापिता व बालकांमधील घनिष्ट संबंधांची संभावना कमी होत जाते. त्यामुळे बालकांमध्ये सामाजिक संबंधांचा विकास मंद होतो.

**३)कुटुंबातील भौतिक वातावरण:**

- बालकांच्या समाजीकरणाच्या विकासात कुटुंबातील भौतिक वातावरणाचे महत्वाचे योगदान असते. ज्या कुटुंबात वर्तमानपत्रे, मासिके, रेडिओ, टेलिव्हिजन, कम्प्युटर यांसरख्या सुविधा उपलब्ध असतात त्या कुटुंबातील बालकांचे वेगाने समाजीकरण घडून येते.

**समाजाची भूमिका:**

- कुटुंबात बालकांच्या मूल्यविकासाचे बिजारोपण होते तर समाजात या मुल्यांचे संवर्धन व प्रसारण होते. बालक तसेच वयस्कांच्या मूल्य विकासात समाजीकरण, समवयस्कांचे गट, शेजार, जाती व वर्ग, राजकीय, आर्थिक व धार्मिक संस्था, नागरिक समाज, मिडिया इत्यादींची व्यापक भूमिका असते.

**१)समाजीकरण :**

- समाजीकरण म्हणजे व्यक्तीचे समाजात राहण्याची व त्याचा सक्रिय सदस्य बनण्याची प्रक्रिया होय. त्यामध्ये व्यक्ती सामाजिक मापदंड व मुल्यांबरोबरच आपली सामाजिक भूमिका बजावण्याची कला सुद्धा शिकत असतो. तो प्रचलित सामाजिक मूल्यांनुसार आपले आचरण निश्चित करतो आणि आपल्या व्यक्तीमत्वाचा विकास घडवून आणतो.
- जर समाजीकरणाची प्रक्रिया नकारात्मक झाली तर त्याचा दुष्परिणाम व्यक्ती अपराधी बनण्याच्या स्वरुपात पुढे येतो. त्यामुळे ही प्रक्रिया सकारात्मक असण्याची आवश्यकता असते, ज्यामध्ये परंपरागत मूल्यांबरोबरच नवीन मूल्यांचेही प्रशिक्षण दिले गेले पाहिजे. नवीन मूल्यांनी युक्त झालेले व्यक्ती समाजात आपली नवीन भूमिका बजावू शकतो.

**२)समवयस्कांचे गट:**

- बालक चालण्याफिरण्याच्या क्षमतेचे झाल्यानंतर ते कुटुंबाच्या बाहेर पडून समवयस्क बालकांसमवेत आपल्या मित्रांचे गट तयार करतात. या गटांचे सर्वात महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ते समवयस्क मात्र भिन्न कुटुंबातील बालकांचे गट असतात.
- समवयस्कांचा पहिला गट ३-५ वर्षांच्या बालकांचा असतो, जो शाळेत प्रवेश करण्याच्या आधी निर्माण होतो. या गटातील मुले विविध खेळ खेळतात, ज्यांमध्ये कल्पनात्मक खेळांचे महत्व अधिक असते. त्यातून मुलांची तर्कशक्ती विकसित होते व त्यांना नवनवीन अनुभव प्राप्त होतात. या वयाची मुले एकमेकांचे निरीक्षण व अनुकरण करून भरपूर शिकतात.
- दुसरा समवयस्कांचा गट शाळेत प्रवेश करणाऱ्या मुलांचा असतो. या गटावर समाजीकरणाचा प्रभाव अधिक प्रमाणात होतो. गटातील मुलामुलींच्या आवडीनिवडी, भाषा इत्यादींचा प्रभाव परस्परांवर पडतो. त्यातून सकारात्मक तसेच नकारात्मक प्रभाव निर्माण होतात.

**३)शेजार :**

- बालकांवर शेजारी राहणाऱ्या व्यक्तींच्या व्यवहारांचाही प्रभाव पडतो. त्यातूनही त्यांचे समाजीकरण घडून येऊन सहकार्य, परोपकार यांसारखी मूल्ये आत्मसात होतात. मात्र शेजाऱ्यांशी होणारी भांडणे, स्पर्धा यांचे दुष्परिणामही होतात.

**४)जाती व वर्ग:**

- भारतात जन्मावर आधारलेल्या जातीव्यवस्थेचा व्यक्तीच्या जीवनावर जन्मापासून मृत्यूपर्यंत विविध प्रकारे प्रभाव पडतो. प्रत्येक जाती व्यक्तींसाठी काही निश्चित नियम व प्रतिबंध प्रस्तुत करते. उदा. विवाह, व्यवसाय, सामाजिक संबंध या सर्वांवर जातीव्यवस्थेचा परिणाम पडतो. तसेच जातीव्यवस्थेमुळे व्यक्तींचे धर्मिक व सामाजिक अधिकार व कर्तव्यांचेही निर्धारण होते.
- भारतात आजही जातीव्यवस्थेचा एवढा प्रभाव आहे की शिक्षित तसेच अशिक्षित लोक विवाह संबंध, जाती प्रथा तोडण्याची हिंमत करीत नाही, कारण त्यांची सामाजिक मनोवृत्ती व अभिव्यक्ती व मूल्ये मोठ्या प्रमाणात जाती व्यवस्थेच्या नियमांद्वारे निर्धारित होतात.
- जातीव्यवस्थेमुळे भारतीय समाज तीन वर्गव्यवस्थेमध्येही विभाजित झालेला आहे: उच्च वर्ग, मध्यम वर्ग व निम्न वर्ग. या वर्गांची आपापली विशेष सामाजिक व आर्थिक परिस्थिती असते. त्या आधारावर त्यांच्या सदस्यांमध्ये वर्ग जाणिवेची एक निश्चित सामाजिक विचारधारा निर्माण होते.

५)भाषा:

●मुलांचा बौद्धिक विकास भाषेवर अवलंबून असतो, कारण भाषेच्या आधारेच तो आपले विचार, आदर्श, सामाजिक मूल्ये व संस्कृतीचे आदानप्रदान करतो. त्यामुळे मूल्य निश्चितीमध्ये भाषेचे मध्यवर्ती स्थान आहे.

६)नागरिक समाज:

●संघटित नागरिक समाज जनतेला शिक्षित व जागरूक बनवून लोकांना स्वस्थ्य व मूल्यपूर्ण आचरण करण्यासाठी साहाय्यभूत ठरतो.

७)राजकीय संस्था:

●हुकूमशाही सरकारमध्ये जनतेच्या मनात असुरक्षा, विवशता व हीनतेची भावना निर्माण होते, ज्यामुळे त्यांच्या समाजीकरणावर दुष्प्रभाव पडतो. मात्र कल्याणकारी सरकारमध्ये जनतेच्या मनात सुरक्षा, स्थैर्य, आत्मविश्वास निर्माण होतो. त्यामुळे जनता नवनवीन सामाजिक अनुभव प्राप्त करू शकते. विविध राजकीय पक्ष व संस्थांही जनतेमध्ये मूल्ये व नितिमत्तेची जाणीव निर्माण करतात.

८)आर्थिक संस्था:

●बँका, सरकारी कार्यालये, कारखाने, दुकाने अशा अनेकविध सरकारी संस्थाशी व्यक्तींचा संबंध येतो. त्यातून व्यक्ती नवनवीन सामाजिक व्यवहार शिकतात, जे त्यांची मनोवृत्ती, विचार व कृतींना प्रभावित करतात. त्यांच्या परिणामस्वरूप व्यक्ती सामाजिक मूल्ये व नियमांना अनुरूप स्वतःत बदल करतो व त्यानुसार आपले सामाजिक व्यवहार पूर्ण करतो.

९)धार्मिक संस्था:

●प्रत्येक धर्म एका विशेष अलौकिक शक्तीमध्ये विश्वास करतो व असा विश्वास आपल्या अनुयार्यींमध्येही निर्माण करतो. धर्म व्यक्तींमध्ये पाप व पुण्याच्या कल्पनांची निर्मिती करतो. धार्मिक विश्वासामुळेच व्यक्ती चोरी करणे, हत्या करणे, व्यसन करणे, बलात्कार यांसरख्या दुष्कृत्यांपासून दूर राहण्याचा प्रयत्न करतो.

१०)प्रसार माध्यमे:

●व्यक्तींमध्ये मूल्य विकसित करण्यामध्ये प्रसार माध्यमे महत्वपूर्ण भूमिका बजावतात. प्रसार माध्यमे माहिती व घटना जनतेसमोर वास्तविक स्वरूपात मांडून मानवी संवेदना व भावनांना प्रेरित करतात.

## शैक्षणिक संस्थांची भूमिका:

●मुलांच्या शिक्षणाचा प्रमुख कालावधी ५ ते १८ वर्षे असतो. ...र्वाधिक वेळ शैक्षणिक संस्थांमध्ये घालवतात. त्यामुळे तेथे त्यांच्या जीवनाच्या अनेक मूल्यांचे निर्धारण होते. हे ध्यानात घेऊनच भारताच्या राष्ट्रीय शिक्षण धोरणात म्हटले आहे की, आपल्या बहुजातीय व बहुवर्गीय समाजात शिक्षणाला सर्वव्यापी बनविले पाहिजे आणि शाश्वत मूल्यांना प्रोत्साहित केले पाहिजे, जेणे करून भारतीय जनतेमध्ये राष्ट्रीय एकतेची भावना वाढीस लागेल आणि सांप्रदायिकता, अंधविश्वास, दैववाद व हिंसा समाप्त केली जाऊ शकेल. त्यासाठी शिक्षणाच्या सर्व स्तरांवर (प्राथमिक, माध्यमिक व विद्यापीठीय) वैज्ञानिक मनोवृत्ती, समानता, स्वातंत्र्य, न्याय व बंधुता, धर्मनिरपेक्षता इत्यादी लोकशाही मूल्यांबरोबरच पर्यावरण संरक्षण इत्यादींचे शिक्षण दिले जाणे आवश्यक आहे.

●शाळा-कॉलेजांमधून मुलांमध्ये खेळांच्या माध्यमातून शारीरिक, मानसिक तसेच टिम वर्क च्या विकासास मदत होते. त्यांमुळे धैर्य, शालीनता, सहनशिलता, परस्पर सहकार्य यांसारख्या सामाजिक मूल्यांचा विकास होतो.

●शाळा-कॉलेजांमध्ये महान नेते, विद्वान, विचारवंत यांचे जन्मदिवस साजरे केले जातात. त्यांमुळे त्यांचे विचार मुलांपर्यंत पोहोचतात. प्रजासत्ताक दिन, स्वातंत्र्य दिन, गांधी जयंती यांसारचे दिवस साजरे केल्याने राष्ट्र व समाजाप्रती समर्पणाची भावना जागृत होते.